# पदव्युत्तर अभ्यासक्रम प्रवेशासाठी मुदतवाढ

## एमए, एम. कॉम, एलएलएम भाग एक तर अधिविभागातील भाग दोन आणि तीन अभ्यासक्रमांचा समावेश

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षातील एमए., एमकॉम. व एल.एल.एम. भाग १ अभ्यासक्रमांचे प्रवेश अर्ज भरण्याची मुदत ५ सप्टेंबरपर्यंत वाढविली आहे. कोरोनाच्या वाढत्या प्रादुर्भावामुळे बऱ्याच विद्यार्थ्यांना प्रवेश अर्ज भरता आलेले नाहीत. त्यामुळे ही मुदतवाढ देण्यात आली आहे. तरी जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन विद्यापीठ प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर केलेल्या लॉकडाऊनमुळे एकही विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नये म्हणून विद्यापीठ प्रशासनाने २०२०-२०२१ या शैक्षणिक वर्षातील एम.ए., एम.कॉम. व एल.एल.एम. भाग १ या अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी ऑनलाईन प्रवेशअर्ज भरण्याची ५ सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ दिली आहे. ज्या विद्यार्थ्यांनी अद्याप एमए., एमकॉम. व एलएलएम भाग १ या अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी ऑनलाईन अर्ज केलेले नाहीत,



अशा विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या **http://www.unishivaji.ac.in/mscadmission/admission-2020** या लिंकवर ऑनलाईन अर्ज भरावा.

सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षामध्ये विद्यापीठ अधिविभागात भाग २ व भाग ३ या अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया संबधित अधिविभागामार्फत सुरु करण्यात आली आहे. संबंधित विद्यार्थी/ विद्यार्थिनींनी याबाबत आपल्या अधिविभागाशी दूरध्वनी अथवा ईमेलद्वारे संपर्क साधून आपला प्रवेश निश्चित करावा. प्रवेशासाठी अधिविभागात प्रत्यक्ष उपस्थित राहण्याची आवश्यकता नाही, असे पदव्युत्तर प्रवेश विभागाच्या वतीने जाहीर करण्यात आले आहे.

### सीएचबी प्राध्यापकांना न्याय देऊ : डॉ. करमळकर

सीएचबी प्राध्यापकांच्या नेमणुकांसह अन्य प्रश्न लवकरच सोडवणार आहे, असे आश्वासन प्रभारी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांनी प्राचार्य संघटनेला दिले. विद्यापीठाने ऑनलाईन शिक्षणाचे आदेश दिले आहेत. परंतु बहुतेक महाविद्यालयात प्राध्यापकांची संख्या अपुरी असल्याने ऑनलाईन शिकवणे शक्य नाही, या विषयावर बैठकीत चर्चा झाली. दरम्यान कुलगुरू डॉ. करमळकर यांनी उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या सचिवांबरोबर चर्चा करून सीएचबी प्राध्यापकांचे प्रश्न मार्गी लावण्याचे आश्वासन दिले. येत्या काही दिवसात अधिष्ठाता व अभ्यास मंडळाची बैठक घेवून ऑनलाईन शिक्षणाबाबत निर्णय घेतला जाईल. तसेच प्राध्यापकांच्या दोन मान्यतेमध्ये विद्यापीठ प्रशासन पक्षपातीपणा करत असल्याचे निदर्शनास आणून दिले.

## कमी मनुष्यबळ असतानाही विद्यापीठाचे निकाल जाहीर

- पदवी व पदव्युत्तरच्या ४० विषयांचा समावेश
- आज जवळपास १०० निकाल जाहीर होण्याची शक्यता

शिवाजी विद्यापीठातील परीक्षा विभागाने कमी मनुष्यबळ असतानाही गेल्या सहा दिवसात ४० निकाल जाहीर केले आहेत. तर आज जवळपास १०० निकाल जाहीर होण्याची शक्यता आहे, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे यांनी दिली.

कोरोनाचा संसर्ग रोखण्यासाठी यंदा प्रथम व व्दितीय वर्षाच्या परीक्षा झाल्या नाहीत. राज्य शासनाच्या मार्गदर्शक सुचनांप्रमाणे पदवी व पदव्युत्तर प्रथम व व्दितीय वर्षातील विद्यार्थ्यांना सरासरी मूल्यांकनावर उत्तीर्ण करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार बीए., बीकॉम., बीएस्सी., एमएसडब्ल्यू, एमबीए, एम. टेक., बीएस्सी (कॉम्प्युटर सायन्स, आयटी, शुगर टेक), एम. ए. (योगा, गृहशास्त्र), बी. एड., एम. एड., बीपीएड., तीन आणि पाच वर्षे, विधी, डी. फार्मसी., एम. फार्मसी., विषयांचा समावेश आहे. आज आणखी १०० विषयांचे निकाल लागणार आहेत. तीन अधिकाऱ्यांना कोरोनाची लागण झाल्याने परीक्षा विभागातील कर्मचारी क्वॉरन्टाईन झाले आहेत.